# प्रेस नोट दि. ३१.०१.२०२६

**आरोपी लोकसेवक १) श्री. सुनिल शिवाजी गुरव, वय -४० वर्षे, व्यवसाय - नोकरी ( सहा. पोलीस निरीक्षक  मिरज ग्रामीण पोलीस ठाणे) रा. वृंदावन बंगला, विवेकानंद कॉलनी, मिरज, ता. मिरज. जि. सांगली वर्ग- २ व खाजगी इसम आरोपी २) श्री. जयवंत ईश्वर नागरगोजे, वय - ५४ वर्षे, , व्यवसाय - शेती (खाजगी इसम) रा. नागरगोजेवाडी, बेडग, ता. मिरज, जि. सांगली यांनी तक्रारदार यांचेकडे ८०००००/- रूपये लाचेची मागणी करून चर्चेअंती ६०००००/- रूपये लाचेची मागणी करुन सापळा कारवाईमध्ये ६०००००/- रुपये लाच रक्कम स्विकारले असता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सांगली विभागाची कारवाई**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | सांगली |
|---|---|
| पोलीस स्टेशन | मिरज ग्रामीण पोलीस ठाणे, जि.सांगली |
| गुन्हा नोंद क्रमांक व कलम | गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरू आहे. |
| तक्रारदार | पुरुष वय ३३ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नांव व कार्यालय | १) श्री. सुनिल शिवाजी गुरव, वय -४० वर्षे, व्यवसाय - नोकरी (सहा. पोलीस निरीक्षक - मिरज ग्रामीण पोलीस ठाणे ) रा. वृंदावन बंगला, विवेकानंद कॉलनी, मिरज, जि. सांगली वर्ग- २<br>२) श्री. जयवंत ईश्वर नागरगोजे, वय - ५४ वर्षे, , व्यवसाय - शेती (खाजगी इसम) रा. नागरगोजेवाडी, बेडग, ता. मिरज, जि. सांगली |
| पडताळणी कारवाई वेळी मागणी केलेली लाचेची रक्कम व दिनांक | ६०००००/- (आठ लाख ) रुपये लाचेची मागणी<br>दि.३१.०१.२०२६ रोजी मिरज ग्रामीण पोलीस स्टेशनचे पुर्व बाजुस असले रोड लगत |
| सापळा कारवाई वेळी स्विकारलेली लाचेची रक्कम | ६०००००/- (सहा लाख) रुपये लाचेची मागणी |
| सापळा कारवाई दिनांक व ठिकाण | दि.३१.०१.२०२६ रोजी मिरज ग्रामीण पोलीस स्टेशनचे पुर्व बाजुस पंढरपुर रोड लगत असले टी कॉफी शॉप येथे |
| थोडक्यात हकीकत | यातील तक्रारदार यांचे विरुद्ध मिरज ग्रामीण पोलीस ठाणे येथे दाखल असले [illegible] गुरनं ४९३/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३०७, ३२४, ५०६ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम १३५, ३७(१), (३) व शस्त्र अधिनियम कलम ४, २७ या गुन्ह्यामध्ये तक्रारदार यांचा पुर्वी मंजूर असलेला अटक पुर्व जामीन नामंजुर करण्यासाठी न्यायालयात पाठवलेल्या अहवालामध्ये मदत करण्यासाठी व प्रांताधिकारी मिरज यांचेकडे पाठविलेल्या हद्दपारी प्रस्तावाची अंमल बजावणी न करता प्रतिबंधात्मक कारवाई करण्यासाठी आरोपी लोकसेवक क्र. १) सुनिल शिवाजी गुरव, सहा. पोलीस निरीक्षक - मिरज ग्रामीण पोलीस ठाणे व आरोपी क्र. २) जयवंत ईश्वर नागरगोजे, खाजगी इसम रा. नागरगोजेवाडी, बेडग, ता. मिरज यांनी तक्रारदार यांचेकडे ८०००००/- रुपये लाचेची मागणी केली व आरोपी क्र २) जयवंत नागरगोजे यांनी तक्रारदार यांना त्यांचे काम आरोपी लोकसेवक सुनिल गुरव यांना सांगुन करुन देण्याची हमी दिली असल्या बाबत तक्रारदार यांनी तक्रार दि.३१.०१.२०२६ रोजी पथकास दिली होता.<br>तक्रारदार यांनी दिले लाच मागणी तक्रारी अर्जाचे अनुषंगाने दि.३१.०१.२०२६ रोजी मिरज ग्रामीण पोलीस ठाणे चे आवारात पडताळणी केली असता आलोसे क्र. २) जयवंत ईश्वर नागरगोजे, खाजगी इसम, रा. नागरगोजेवाडी, बेडग यांनी तक्रारदार यांचेवर प्रभाव पाडुन आरोपी क्र १) सुनिल शिवाजी गुरव यांचेकरीता लाचेची मागणी केली व आरोपी क्र. १) सुनिल गुरव यांनी तक्रारदार यांना त्यांचा अटकपुर्व जामीन ना मंजुर झाल्यास त्यांना अटक न करण्यासाठी व हद्दपार प्रस्तावातील आदेशा प्रमाणे हद्दपार कारवाई न करता प्रतिबंधात्मक कारवाई करुन मदत करण्यासाठी तक्रारदार यांचेकडे चर्चेअंती ६०००००/- रुपये (सहा लाख रुपये) लाचेची मागणी केली.<br>त्यानंतर दि. ३१.०१.२०२६ रोजीचे सापळा कारवाई वेळी यातील आलोसे क्र १) सुनिल शिवाजी गुरव, सहा. पोलीस निरीक्षक - मिरज ग्रामीण पोलीस ठाणे यांनी तक्रारदार यांचेकडून मिरज ग्रामीण पोलीस ठाणेचे समोर असलेल्या कॉफी शॉप जवळ ६०००००/- रूपये लाच रक्कम स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे व आलोसे क्र. २) आलोसे क्र. २) जयवंत ईश्वर नागरगोजे, खाजगी इसम, रा. नागरगोजेवाडी, बेडग यांनी तक्रारदार यांचेवर प्रभाव पाडुन आरोपी क्र १) सुनिल शिवाजी गुरव यांचेकरीता लाचेची मागणी केल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे.<br>त्या अनुषंगाने आलोसे क्र. १) श्री. सुनिल शिवाजी गुरव, वय -४० वर्षे, व्यवसाय - नोकरी ( सहा. पोलीस निरीक्षक - मिरज ग्रामीण पोलीस ठाणे ) रा. वृंदावन बंगला, विवेकानंद कॉलनी, मिरज, ता. मिरज. जि. सांगली वर्ग- २ व खाजगी इसम आरोपी क्र २) श्री. जयवंत ईश्वर नागरगोजे, वय - ५४ वर्षे, , व्यवसाय - शेती (खाजगी इसम) रा. नागरगोजेवाडी, बेडग, ता. मिरज, जि. सांगली यांचेविरूध्द मिरज पोलीस ठाणे येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७, व १२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरू आहे. |
| तपास अधिकारी | श्री. योगेश चव्हाण, पोलीस निरीक्षक, ला. प्र. वि. सांगली |
| मार्गदर्शन अधिकारी | पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे,<br>अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे |

Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| सापळा पथक | श्री यास्मीन इनामदार, पोलीस उप अधीक्षक, सांगली, पोलीस निरीक्षक श्री योगेश चव्हाण, पोलीस निरीक्षक, श्री.किशोरकुमार खाडे, पोलीस निरीक्षक तसेच पोलीस अंमलदार प्रितम चौगुले, अजित पाटील, ऋषिकेश बडणीकर, पोपट पाटील, सलीम मकानदार, उमेश जाधव, धनंजय खाडे, सुदर्शन पाटील, चंद्रकांत जाधव, अमर शेस्वरे, सागर नायकवडी, सीमा माने, विणा जाधव, चालक विठ्ठल रजपुत |

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप व मोबाईल नंबर ९४०४०४१०६४ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

श्रीमती यास्मीन शरीफ इनामदार
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
सांगली.

Scanned with OKEN Scanner